# 'मेघमल्हार'ने तरुणाई थिरकली

## दोडामार्गमध्ये काव्यवाचन : रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

कसई दोडामार्ग : दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील 'ये रे घना ये रे घना न्हाऊ घाल माझ्या मना' अशी पावसाला साद घालणारा 'मेघमल्हार' हा पावसावरील काव्यवाचन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळातर्फे सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमास तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आषाढ व श्रावण यांचा संगम होत असताना आणि धरणीमाता हिरवा शालू नेसून, साज श्रृंगार करून नटली-सजली असताना आनंदाने बेहोष झालेल्या युवाईने पावसात भिजत, पावसाकडे वेगवेगळ्या दृष्टीतून बघत, आपल्या विशिष्ट ढंगात ताल व स्वरांच्या संगतीने अनेक कविता सदर केल्या.

पाऊस खेड्यातला, पाऊस शहरातला, महाविद्यालयातला, डोंगर पिकातला, रानामधला, माणसाच्या मनामनातला, प्रियकरांना भावणारा व भिजवणारा, डांबरी रस्त्यावरचा असा हा पाऊस सर्वांना हवाहवासा वाटतो. तो कधी हसायला शिकवतो, तर कधी रडायलाही, असे विविध भाव व्यक्त करणाऱ्या विषयांवरील कवितांना 'मेघमल्हार' न्हावून निघाला.

राजेश नाईक याने; 'श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे', ये रे ये रे पैसा तुला देतो पैसा' या कविता वेगळ्या ढंगात सादर केल्या. बालकवी ठोंबरे, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर, कुसुमाग्रज, रे. टिळक, बा. सी. मर्ढेकर, चि. त्र्यं. खानोलकर आदी कवींच्या पावसावरच्या कवितांचा मेघमल्हारमध्ये समावेश होता.

अनिल गावडे, अक्षय राऊत, भूषण सावंत, राजेश नाईक, मनीषा वरक, प्रियांका पवार, महादेव नाईक, विमल माजिक, राखी सावंत, शैला कांबळी, मधू बोर्डेकर, सागर गवस या विद्यार्थ्यांनी विविध कविता सादर करून उपस्थितांना मेघमल्हारची अनुभूती दिली. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते झाले. पावसावरच्या कविता गातानाच निसर्गाचे संवर्धन कसे करता येईल, या विषयीही प्रत्येकाने चिंतन करावे व त्याचे भान ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. दिलीप बर्वे यांनी कार्यक्रमाचा हेतू कथन केला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी 'मराठी भाषा व वाङ्मय मंडळातील सदस्य, विद्यार्थी, प्राध्यापक, इतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन विमल माजिक तर आभार सागर गवस याने मानले. (वार्ताहर)